# मिरा भाईंदर महानगरपालिका

## निवडणूक विभाग

// इतिवृत्तांत //

**निवडणूक पूर्व आढावा बैठक क्र.१, दि.३०/९/२०२५**

**श्री. राधाबिनोद शर्मा** आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.३०/९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा. आयुक्त कार्यालय, सभाकक्ष येथे निवडणूक पूर्व आढावा बैठक पार पडली.

**बैठकी दरम्यान मा. आयुक्तांनी दिलेल्या सूचना/निर्देश खालील प्रमाणे-**

| अ.क्र. | मा. आयुक्तांचे निर्देश | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | मध्यवर्ती निवडणूक कक्षाची स्थापना करुन त्यामध्ये अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करणे. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (निवडणूक) |
| २. | मतदानाची टक्केवारी वाढ करणेकरीता (IEC-SVEEP) जनजागृती प्रभावीपणे राबविणेसाठी शिक्षण विभाग, समाजविकास विभाग, प्रभाग अधिकारी यांचे सहकार्य घेऊन नाविन्यपूर्ण काय करता येईल याबाबत नियोजन करणे. | श्रीम. कविता बोरकर, उपायुक्त (शिक्षण) |
| ३. | SVEEP करीता Nodal Officer नियुक्त करणे. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (निवडणूक) |
| ४. | मतदान केंद्रावर मतदार मतदान अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी किमान सुविधांबाबत चेकलिस्ट तयार करणे, प्राथमिक तपासणी करुन पूर्तता करणे व तद्नंतर पूर्ततेबाबत दुरुस्ती तपासणी करुन अहवाल तयार करणे. | श्री. नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| ५. | मतदान अधिकारी/कर्मचारी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी वेळेत व चांगली सुविधा देण्याची दक्षता घेणे त्याकरीता पूर्व नियोजन करणे. उदा. खानपान, स्टेशनरी, संगणकीय व्यवस्था, वाहन व्यवस्था इ. | संबंधित नियुक्त अधिकारी |
| ६. | मतदानाच्या दिवशी/मतमोजणीचे दिवशी मा. राज्य निवडणूक आयोगांकडे सादर करावयाचे अहवाल/माहितीकरीता शाळा/कॉलेजचे विद्यार्थी यांचे सहकार्य घेणेसाठी आवश्यक पूर्वतयारी करणे. | श्रीम. कविता बोरकर, उपायुक्त (शिक्षण)<br>श्रीम. दिपाली जोशी, समाज विकास अधिकारी |
| ७. | सर्व मतदान केंद्र CCTV ने जोडून कंट्रोलरुम तयार करणे, कंट्रोल रुममध्ये देखरेखीसाठी शाळा / कॉलेजचे विद्यार्थी यांचे सहकार्य घेणेसाठी आवश्यक पूर्व तयारी करणे. | श्रीम. मनस्वी म्हात्रे, सिस्टीम ॲनालिस्ट<br>श्रीम. दिपाली जोशी, समाज विकास अधिकारी |
| ८. | निवडणूक विषयक नेमून दिलेल्या कामासाठी विषयनिहाय नोडल अधिकारी नियुक्त करणे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति.आयुक्त (१)<br>श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (निवडणूक) |
| ९. | मतदानाच्या दिवशी / मतमोजणीच्या दिवशी विद्यूत पूरवठा / इंटरनेट सुविधा सुरळीत राहील याबाबत दक्षता घेणेकरिता विज पूरवठा करणाऱ्या कंपनी सोबत पत्रव्यवहार करावा. | श्री. नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता (विद्यूत)<br>श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर |
| १०. | मतदानाच्या दिवशी आपतकालीन परिस्थितीकरीता वैद्यकीय सुविधा जसे ॲम्बूलंन्स, व्हिलचेअर, वैद्यकीय पथकाबाबत पूर्व नियोजन करणे. विभाग | श्रीम. कविता बोरकर, उपायुक्त (सार्व. आरोग्य) |

| अ.क्र. | मा. आयुक्तांचे निर्देश | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | निहाय ठराविक मतदान केंद्रासाठी निश्चित करुन ॲम्बूलन्सची व्यवस्था करण्याचे नियोजन करणे. | डॉ. प्रमोद पडवळ,<br>वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ११. | होम वोटिंग बाबत पूर्व नियोजन करणे. | श्रीम. कल्पिता पिंपळे,<br>उपायुक्त (निवडणूक)<br>श्रीम. दिपाली जोशी,<br>समाज विकास अधिकारी |
| १२. | विशेष मतदान केंद्र स्थापन करणेचे नियोजन करणे उदा. महिला मतदान केंद्र, दिव्यांग मतदान केंद्र इ. | श्रीम. कल्पिता पिंपळे,<br>उपायुक्त (निवडणूक) |
| १३. | एक खिडकी योजने अंतर्गत विविध परवानग्या देणेसाठी एकत्रीत APP तयार करता येईल का? त्याबाबत नियोजन करणे. निवडणूक कामी वेगवेगळे APP तयार न करता एकच APP तयार करता येईल याचा अभ्यास करावा. | श्री. राज घरत,<br>सिस्टीम मॅनेजर |
| १४. | निवडणूकी संदर्भात महत्वाची माहिती जबाबदाऱ्या, संपर्क क्रमांक याबाबत माहिती पुस्तिका तयार करणे. | श्री. संभाजी पानपट्टे,<br>अति.आयुक्त (१)<br>श्री. दिनेश कानगुडे,<br>नगरसचिव |
| १५. | निवडणूक विषयक खर्चासाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूदीचे नियोजन करणे. | श्री. शिरिष धनवे,<br>मुख्य लेखा अधिकारी<br>श्री. सुधिर नाकाडी,<br>मुख्य लेखा परिक्षक |
| १६. | सर्व संबंधित विभागाने नेमून दिलेल्या कामा संबंधिच्या निविदांची प्रक्रिया वेळेत पूर्ण होईल याबाबत दक्षता घेणे. | संबंधित नियुक्त अधिकारी |
| १७. | वाहन/परिवहन व्यवस्थेचा आढावा घ्यावा. निवडणूक कामी पूरविण्यात येणारी वाहने सुस्थितीत असावीत. | श्री. सचिन बांगर,<br>उपायुक्त (वाहन)<br>श्री. दिनेश कानगुडे,<br>नगरसचिव |
| १८. | नवनियुक्त सदस्य, अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणारे प्रमाणपत्र/प्रशस्तीपत्रक चांगल्या प्रतीची असावी. याबाबत दक्षता घेणे. | श्रीम. कल्पिता पिंपळे,<br>उपायुक्त (निवडणूक)<br>श्री. दिनेश कानगुडे,<br>नगरसचिव |

उपरोक्त सुचनांची विहीत मुदतीत अंमलबजावणी होईल याची संबंधित अधिकाऱ्यांनी खबरदारी घ्यावी. तसेच कामकाज वाटप संदर्भात स्वंतत्रपणे निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सर्व संबंधित विभाग प्रमुख/खाते प्रमुखांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडण्याची दक्षता घ्यावी.

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**सर्व संबंधित अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका